शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

<u>तक्रार अर्ज क्रं.०३/२०२१</u>

| | |
|---|---|
| श्रीमती आशा शामराव इंगवले<br>रा.६६६, ए वार्ड, मंगलदिप अपार्टमेंट,<br>शिवाजी पेठ, कोल्हापूर | तक्रारदार |

विरुध्द्

| | |
|---|---|
| १. डेक्कन एज्यूकेशन सोसायटी,<br>फर्ग्युसन कॉलेज परिसर, पुणे-४<br><br>२. विलिंग्डन महाविद्यालय,सांगली<br>विश्रामबाग परिसर,सांगली. | वि. प |

डेक्कन एज्यूकेशन सोसायटी, पुणे यांचे विलिंग्डन महाविद्यालय, सांगली येथील शिक्षिका श्रीमती आशा शामराव इंगवले यांनी दि.२६/०३/२०२१ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी, प्रा.इंगवले आशा शामराव विलिंग्डन महाविद्यालय, सांगली येथे हिंदी वरिष्ठ विभागात सन १९९२ पासून कार्यरत आहे. मी शैक्षणिक अर्हता पूर्ण केली आहे. माझ्या न्याय मागण्या पुढीलप्रमाणे १) दि.२७/०३/२००८ च्या तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व शासन निर्णय दि.०८ ऑगस्ट १९९६ नुसार मला सन २००९ पासून हिंदी वरिष्ठ विभागात शिल्लक असलेला कार्यभार देवून सन २००९ पासूनच पूर्णवेळ कार्यभार, संपूर्ण पगार व तदअनुषंगीक सर्व लाभ मिळावेत २) दि.२५/०९/२००० रोजीच्या सकाळ मधील जाहिरातीनुसार माझी विद्यापीठ निवड समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी मुलाखत घेवून अर्धवेळ निवड केली त्या दिनांकापासून मला पूर्णवेळचे नेमणूक पत्र मिळावे. ३) विद्यापीठ मान्यता शिक्षकामध्ये माझा समावेश करावा व संपूर्ण पगार मिळावा. ४) डेक्कन एज्यूकेशन सोसायटीच्या विलिंग्डन महाविद्यालयाने दै. सकाळ मध्ये दि.२५/०९/२००० रोजी दिलेल्या जाहिरातीतील कलम क्रं.६ प्रमाणे शैक्षणिक अर्हता प्राप्त करणारी व इतर अटी पूर्ण करणारी मी एकमेव महिला असल्याने माझी निवड अर्धवेळ ऐवजी पूर्णवेळ होवून व महिला आरक्षणाचा न्याय हक्क देवून एका महिलेवरचा अन्याय दूर करून तिला न्याय द्यावा हि विनंती.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

श्रीमती आशा इंगवले या विलिंग्डन महाविद्यालयात हिंदी विषयाच्या अर्धवेळ पदावर कार्यरत आहेत. श्रीमती इंगवले यांनी अर्धवेळ कार्यभार पद असूनही, पूर्णवेळ कार्यभार मिळण्यासाठी तक्रार केलेली आहे. त्यांची अर्धवेळ पदावरील निवड, कार्यभार आणि मान्यता याविषयी महाविद्यालयाने नियमाप्रमाणे पूर्तता केलेली आहे.

श्रीमती इंगवले यांनी तक्रार अर्ज पान नंबर चार वर यासंदर्भात प्रकरण न्यायालयात दाखल आहे काय? याचे त्यांनी नाही असे चुकीचे उत्तर दिले आहे. श्रीमती इंगवले यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट अर्ज क्रमांक १८१/२०१८ दाखल केली असून ते प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

रिट अर्ज क्र. १८१/२०१८ मधील विवाद आणि मागण्या आणि आपणाकडे केलेल्या तक्रारीतील विवाद आणि मागण्या ह्या सारख्याच आहेत. पूर्णवेळ नियुक्ती आणि महिला आरक्षणाचा मुद्या हा न्यायालयासमोरील प्रलंबित याचिकेत देखील त्यांनी मांडला आहे.

उपरोक्त संदर्भात रिट याचिका ही मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या समोर प्रलंबित आणि विचाराधीन आहे. तरी त्याच विषयावरील तक्रारीची दखल तक्रार निवारण समिती समोर घेणे योग्य होणार नाही. सबब सदर तक्रारीचा विषय न्यायप्रविष्ठ असल्याने, तक्रार खारीज करणे अथवा मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाची वाट बघणे आवश्यक आहे. मा.न्यायालय याचिकेची प्रत अवलोकनासाठी अर्जासोबत जोडली आहे.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तूतची तक्रार तक्रारदारांना गैरअर्जदार महाविद्यालयातून सन २००१ पासून पूणवेळ कार्यभार मिळण्याबाबत व महिला आरक्षण मिळणे याबाबत दाखल केलेली आहे.

तक्रारदारांच्या तक्रारीत म्हणणे असे आहे की, विलिंग्डन महाविद्यालय, येथे हिंदी विषयाच्या विभागामध्ये सन १९९२ पासून कार्यरत आहेत. तक्रारदाराने शैक्षणिक अर्हतेची पूर्तता केलेली आहे. तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व शासन निर्णय दिनांक ०८.०८.९६ अनुसार सन २००१ पासून हिंदी विषयाच्या विभागात शिल्लक असलेला कार्यभार देऊन त्यावेळेपुरतेच पूर्णवेळ कार्यभार, मिळणारे वेतन व त्या अनुषंगिक सर्व लाभ मिळावेतसे दिनांक २५.०९.२००० रोजीच्या दैनिक सकाळ मध्ये जाहिरातीनुसार विद्यापीठ निवड समिती व शिक्षण विभाग, कोल्हापूर यांनी त्यांची मुलाखत घेऊन अर्धवेळ म्हणून निवड केली त्या दिनांकापासून तिला पूर्णवेळासाठी नियुक्ती पत्र मिळावे

तसेच विद्यापीठ मान्यता शिक्षक म्हणून तिचा समावेश करावा व संपूर्ण वेतन मिळावे. दैनिक सकाळ मधील दिनांक २५.०९.२००४ च्या जाहिरातीमधील कलम क्रमांक ६ प्रमाणे शिक्षक अर्हता प्राप्त करणारी, पूर्ण करणारी ती एकमेव महिला असल्याने तिची निवड अर्धवेळ म्हणजेच पूर्णवेळ करावे व महिला आरक्षणाचा न्याय हक्क देऊन तिच्या वरील अन्याय दूर करावा.

गैर अर्जदार शिक्षण संस्था व प्राचार्य विलिंग्डन महाविद्यालय सांगली यांनी आपले म्हणणे या कामी दाखल केले असून त्यांच्या म्हणण्यानुसार तक्रारदार विलिंग्डन महाविद्यालय, सांगली हिंदी विभागाच्या अर्धवेळ पदावर कार्यरत आहेत असे असून पूर्ण वेळ कार्यभार मिळण्याकरिता त्यांनी तक्रार दाखल केली आहे. त्यांची अर्धवेळ पदावर निवड, कार्यभार व मान्यता याविभायी महाविद्यालयाने पूर्तता केलेली आहे. तक्रारदाराने मा. उच्च न्यायालयातील रिट पिटीशन क्रमांक १८१/२०१८ दाखल केली असून जे प्रकरण मा. उच्च न्यायालयात अद्यापही प्रलंबित आहे. त्या रिट पिटीशन मधील मागणी व या प्रस्तूतच्या तक्रारीतील मागणी या सारख्याच आहेत. तरी त्याच विषयावरील तक्रारीची दखल या समितीने घेणे योग्य होणार नाही. सबब प्रस्तूतची तक्रार दाखल करणे किंवा मा. उच्च न्यायालयाच्या निकालाची वाट बघणे आवश्यक आहे. या निवेदनावरुन तक्रारदाराने प्रस्तूतची तक्रार नामंजूर करावी अशी मागणी केली आहे.

तक्रारदाराने या कामी आपल्या तक्रारअर्जासंबंधी अधिकची माहिती या कामी दाखल केली आहे. त्या माहितीवरुन असे दिसून येते की, तक्रारदार विलिंग्डन महाविद्यालय, सांगली येथे हिंदी विषयाच्या विभागामध्ये सन १९९२ पासून स्थानिक निवड समितीच्या माध्यमातून सन १९९७ पर्यंत पूर्णवेळ कार्यरत होते. त्या पदाची रितसर जाहिरात दि. २५.०२.२००० रोजीच्या दैनिक सकाळ मध्ये प्रसिध्द झाली होती. त्या जाहिरातीमध्ये हिंदी विषयाकरिता एक पूर्ण वेळ आणि एक अर्धवेळ पद दाखविण्यात आले होते. सदर जाहिरातीस अनुसरुन सन २००१ मध्ये विहित विद्यापीठ निवड समिती मार्फत अर्ध वेळ पदाकरिता तिची निवड झाली. तिने पूर्ण शैक्षणिक अर्हता धारण केलेली असल्याने सदर निवडीस शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व मा. सहसंचालक, (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडून शिक्षक मान्यता मिळालेली होती. तथापि, या दोन्ही मान्यतेचे पालन न करता प्राचार्य, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली यांनी तासिका तत्वावर आणि कंत्राटी पध्दतीने नेमणूक दिली. त्या मान्यतांचे पालन होण्याकरिता तक्रारदाराने दिनांक २३.०१.२००७ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार दाखल केली. त्याचा निकाल दि.२७.०३.२००८ रोजी लागून विद्यापीठाच्या मान्यता पत्राप्रमाणे पत्र दिनांकापासून नेमणूक आदेश १५ दिवसात द्यावेत आणि त्या कालावधीपर्यंतचे वेतन आणि अन्य अनुषंगिक लाभ देण्यात यावे असा निर्णय झाला. गैरअर्जदार शिक्षण संस्था यांनी सांगली येथे दिवाणी न्यायालयासमोर त्या निर्णयास आव्हान दिले. त्यांचा दावा क्रं. १८२/२००१ असा होता. तो दावा दिवाणी न्यायालयाने तो त्यांच्या अखत्यारित येत नाही या कारणाकरिता योग्य त्या न्यायालयासमोर दावा दाखल करण्याकरिता

परत केला. त्या आदेशाविरूध्द गैरअर्जदार संस्थेने जिल्हा न्यायालय, सांगली यांचे किरकोळ दिवाणी अपिल क्रं. १८२/२०१० अपील दाखल केले. ते अपील देखील फेटाळण्यात आले. त्यानंतर तक्रारदाराने या तक्रार निवारण समितीच्या दिनांक २७.०३.२००८ रोजीच्या निर्णयाची अमंलबजावणी व्हावी या करिता मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे रिट पिटीशन क्रं. २१९९/२००९ दाखल केले होते. तथापि, त्या रिट पिटीशनच्या कामात गैरअर्जदार संस्थेने सांगली न्यायालयातील दाव्याचा निकाल लावून घेतो अन्यथा तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या निर्णयाची अमंलबजावणी करुन तक्रारदारांना सेवेत सामावून घेऊन वेतनासहित सर्व अनुषंगिक लाभ देण्याची लेखी हमी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांना दिनांक ०६.०९.२०१० रोजी दिली होती. त्या हमीचे पालन विहित मुदतीत न झाल्याने तक्रारदाराने मा. उच्च न्ययालय, मुंबई येथे कोर्टाची अवमान याचिका क्रमांक २८/२०११ दाखल केली होती. तथापि, ती रिट पिटीशन तक्रारदाराच्या वकिलाने तक्रारदारास न सांगता मागे घेतली. त्याबाबत तक्रारदाराने त्यांच्या वकिलाविरुध्द बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्याकडे तक्रार दाखल केली असून ती प्रलंबित आहे.

त्यानंतर पुन्हा तक्रारदाराने रिट पिटीशन क्रं. १८१/२०१८ मध्ये मा. उच्च न्यायालय, मंबई यांच्या समोर दाखल केली आणि त्यात तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या दिनांक २७.०३.२००८ रोजीच्या आदेशाचे पालन करावे असा आदेश शिक्षण संस्था आणि गैर अर्जदार यांना करावा अशी मागणी केली. सदर रिट पिटीशन मा.उच्च न्यायालय, मंबई यांनी दि.१२.०७.२०२१ च्या आपल्या निकालाने गैर अर्जदार क्रं २ आणि ३ (संस्था आणि महाविद्यालय) यांनी केलेल्या निवेदनावरुन खारिज केले. त्या निवेदनाने संस्था, प्राचार्य आणि महाविद्यालयातर्फे या समितीची दिनांक २७.०३.२००८ च्या आदेशाचे पालन केले जाईल व त्याप्रमाणे संबंधित तक्रार आणि तक्रारदाराची अर्धवेळ नेमणूक करिता मान्यता देण्याबाबत प्रस्ताव पाठविला जाईल असे निवेदन मा. उच्च न्यायालयापुढे दाखल केले होते. सदरचे निवेदन तक्रारदाराने दिनांक २५.०३.२०२१ रोजी या समिती समोर दाखल केले असून रिट पिटीशन क्रमांक १८१/२०१८ चा निकाल दिनांक १२.०७.२०२१ रोजी लागला असल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. ती रिट पिटीशन आता प्रलंबित नाही. या सर्व प्रकरणानंतर तक्रारदाराने आपली वरील मागणी पुर्नउच्चारित केली आहे.

या कामी कायम उभयपक्षांचे वक्तव्य ऐकून घेतले व कागदपत्रांचे अवलोकन केले. तक्रारदाराने नमूद केलले सर्व रिट पिटीशन्स या समितीने दिनांक २७.०३.२००८ रोजी पारित केलेले निर्णय, ती मूळ तक्रार, मा. उच्च न्यायालयाचा, गैर अर्जदार संस्था यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्रं. २७३५/२०२२ मध्ये झालेल्या निकालामध्ये दिनांक १५.०३.२०२४ चा निकाल याचे आम्ही अवलोकन केले. रिट पिटीशन क्रं. २७३५/२०२२ या मध्ये गैर अर्जदार संस्थेने मा. उच्च न्यायालयाच्या रिट पिटीशन क्रमांक १८१/२०१८ मधील आदेशानुसार शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांनी घेतलेल्या

सुनावणीनुसार आदेश पारित केला, त्या आदेशाविरुध्द दाद मागितली होती. या सर्व घटनांचा आणि कागदपत्रांचा अभ्यास केल्यानंतर ही समिती या निष्कर्षाला आलेली आहे की, प्रस्तुतच्या तक्रारअर्जामध्ये केलेली मागणी ही सर्वस्वी मूळ तक्रार अर्जातील दिनांक २७.०३.२००८ मध्ये पारित केलेल्या आदेशातील देण्यात आलेल्या मागणीपेक्षा वेगळी आहे. त्या अर्जामध्ये तक्रारदाराची मागणी अशी होती की, विद्यापीठाच्या निर्देशानुसार त्यांना हिंदी अर्धवेळ अधिव्याख्याता पदाची मान्यता दिली असूनदेखील त्यांना कंत्राटी पध्दतीने व त्याकरिता अधिव्याख्याता म्हणून नेमलले होते. त्याकरिता त्यांना त्या आदेशाप्रमाणे अर्धवेळ अधिव्याख्याता म्हणून नेमणूक मिळावी अशी मागणी केलेली होती. तथापि, प्रस्तूत अर्जामध्ये तक्रारदाराने सन २००१ साली पूर्णवेळ अधिव्याख्याता म्हणून त्यांची नेमणूक व्हावी, अशी मागणी केलेली आहे. या दोन्ही मध्ये उच्च न्यायालयासमोर प्रलंबित असणारे आणि दाखल करण्यात आलेल्या वेगवेगळया रिट पिटीशन्सचा विचार करता असे दिसून येते की, त्या सर्व रिट पिटीशन मधील मागण्या, हया मूळ तक्रार अर्जातील मागण्यांपासून निर्माण झाल्या आहेत. त्या मागण्या हया अर्जातील मागण्यांपेक्षा भिन्न (Offshoots) आहेत. त्यामुळे गैरअर्जदारांना हे म्हणता येणार नाही की, मूळ तक्रार अर्ज आणि अनुषंगिक रिट पिटीशन मधील कालावधी आणि मागणी प्रस्तूत तक्रार अर्जातील मागणी या एकच आहेत म्हणून ही तक्रार चालवण्यास पात्र नाही. या समितीचे हे स्पष्ट मत आहे की, प्रस्तूत तक्रार अर्जातील मागणी आणि तथ्ये भिन्न आहेत आणि त्याचा विचार स्वतंत्रपणे करावा लागेल. हया समितीचा मागील निर्णय, मा.उच्च न्यायालयाचे विविध निर्णय, दिवाणी न्यायालयाचा निर्णय, त्यांचा या तक्रारअर्जास बाधा येत नाही.

या ठिकाणी हे नमूद करणे भाग आहे की, तक्रारदाराची मूळ नेमणूक ही अर्धवेळ अधिव्याख्याता म्हणून झालेली होती. त्या नेमणूकीस विद्यापीठाची आणि शैक्षणिक विभागाची मान्यता मिळालेली होती. हे वर आम्ही नमूद केलेच आहे की, त्यानंतर देखील तक्रारदारास तासिका तत्वावर आणि कंत्राटी पध्दतीने नेमणूक दिली होती. त्या नेमणुकीवरुन नमूद केलेली सर्व प्रकरणे दोन्ही पक्षकारांमध्ये चालू होती. त्यात तक्रारदाराची मागणी अशी होती की, तिला सन २००१ सालापासून हिंदी विषयाची पूर्णवेळ व्याख्याता म्हणून नेमणूक करावी आणि त्याचे २००१ सालापासून अनुलक्षून लाभ मिळावे. आता तक्रारदारांचे म्हणणे असे आहे की, आता हिंदी विभागामध्ये कार्यभार वाढलेला आहे, ती पूर्णवेळ काम करीत आहे म्हणून तिला पूर्ण वेळ अधिव्याख्याता म्हणून मान्यता देण्यात यावी. त्याकरिता तक्रारदाराने महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्रं.युएस/जी/१९९६/व्ही.५२६/(४१५२)/विशि-४, दि. ०८.०८.१९९६ या शासन आदेशाचा आधार घेतलेला आहे. सदर शासन निर्णय हा अंशकालीन पदे पूर्णकालीन झाल्यास त्याच पदावरील शिक्षकांचे पूर्णवेळ पदावर नियुक्ती देणे बाबतचा आहे. त्याचा अर्थ असा आहे की, जर अंशकालीन पद जर पूर्णकालीन झाल्यास त्या अंशकालीन पदावर कार्यरत असणा-या शिक्षकाला पूर्णवेळ पदावर नियुक्ती दयावी. अंशकालीन पद हे पूर्णकालीन करावे किंवा नाही हा संबंधित शिक्षणसंस्था आणि

महाविद्यालयाचा स्वेच्छा अधिकार आहे. त्या स्वेच्छा अधिकाराला काही विशिष्ट परिस्थितीशिवाय आव्हान दिले जाऊ शकत नाही किंवा तो स्वेच्छा अधिकार संस्थने अमुक प्रकारे वापरावा किंवा अंशकालीन पद हे पूर्णकालीन पदामध्ये रुपांतरित करावे असा आदेश देत नाही. ही बाब मान्य आहे की, ज्या पदावरती तक्रारदार स्वतः कार्यरत आहेत ते पद अंशकालीन आहे. ते पद पूर्णकालीन करावे किंवा नाही हा संबंधित शिक्षण संस्थेचा स्वेच्छा अधिकार आहे. ही समिती संस्थेला ते पद, पूर्णवेळ पद करावे असा आदेश देऊ शकत नाही आणि जोपर्यंत संस्था ते अंशकालीन पद, पूर्णवेळ पद करावे असा निर्णय घेत नाही, तोपर्यंत तक्रारादाराला तिची नेमणूक पूर्णवेळ पदावरती करण्यात यावी, अशी मागणी करण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे तक्रारदाराची तक्रार मान्य करता येत नाही, असे या समितीचे नम्र मत आहे. सबब, प्रस्तूतची तक्रार खारिज करावी लागेल असे या समितीचे मत आहे. सबब, ही समिती खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

तक्रारदाराची तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.

(झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.)

दिनांक : 17 JUN 2025

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)